| | |
|---|---|
| | नियमित दिवाणी दावा नं.१०६३/२०२५<br>तुकाराम रेडेकर वि. सर्जेराव रेडेकर |

## निशाणी क्रं. २२ वर आदेश.

वादी तर्फे प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व निरंतर ताकीद होवुन मिळणेकरीता प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे. वादीच्या कथनांनुसार, प्रस्तुत दाव्यामध्ये निशाणी क्रं. ५ वर युक्तीवाद झालेला आहे व अर्ज आदेशाकरीता प्रलंबित आहे. असे असताना, प्रतिवादी व त्यांच्या तर्फे इसम राजकीय दबाव आणणे उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांच्या मार्फत दावा कलम १ मधील शेतजमीनीची मोजणी करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याकरीता वादीस उपधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांना हाताशी धरुन मोजणी करण्याकरीता नोटीस काढलेली आहे. इतर लगत पक्षकारांना नोटीस काढणे बंधनकारक असताना केवळ वादीस नोटीस काढुन एकतर्फा मोजणी काम करण्याचा प्रयत्न चालु आहे. सदर मोजणी झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. तरी निशाणी क्रं. ५ च्या निकालापर्यंत प्रतिवादी बेकायदेशीरपणे मनुष्यबळाच्या जोरावर लगत पक्षकारांना नोटीस न काढता मोजणी करु नये असा आदेश पारीत करणेची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी तर्फे म्हणणे दाखल केले. सदर म्हणण्याप्रमाणे, सदरची मोजणी ही ग्रामपंचायत मार्फत केलेली असुन याकामी ग्रामपंचायत पक्षकार केलेले नाही. त्यामुळे मोजणी थांबविण्याचा हुकूम करता येणार नाही. तरी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज व म्हणणे वाचले. दोंन्ही पक्षांना ऐकले. सदरचा दावा हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीचा आहे. निशाणी क्रं. २० लगत दाखल उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांनी पाठविलेली मोजणीबाबतची हद्दी कायम मोजणी

नोटीस पाहिली असता सदर नोटीस ही उपअधिक्षक भुमी अभिलेख माळशिरस यांनी महाराष्ट्र शासन पाझर तलाव यांच्या नावे पाठविलेले आहे. त्यामध्ये सहधारकाचे नाव व पत्ता नमुद आहे. प्रस्तुत मोजणी ही प्रतिवादी यांच्या मार्फत केली जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. तसेच वादीच्या कथनांनुसार केवळ वादीस नोटीस काढली असुन इतर सहधारकांना नोटीस काढलेली नाही हे कथन देखील नोटीस पाहिली असता संभाव्य असल्याचे दिसुन येत नाही. प्रतिवादींचा प्रस्तुत मोजणीशी प्रथमदर्शनी संबंध नसल्याचे दिसते. तसेच प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे हे देखील प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येते.

## **<u>आदेश</u>**

निशाणी क्रं. २२ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

दिनांक - १३.०३.२०२६

**(आदित्य ए.व्यास)**

२ रे सह दि.न्या.क.स्तर माळशिरस.

## CERTIFICATE

I affirm that the contents of the P.D.F file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer :- S.T.Korbu

(b) Name of the Court :- 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C, Malshiras, Dist. Solapur

(c) Order signed by P.O. On :- 14/03/2026

(d) Order uploaded on :- 14/03/2026